# मा. उपमुख्यमंत्री (वित्त) श्री. अजित पवार यांनी सोमवार, दिनांक १० मार्च २०२५ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

**(अ) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी राज्यकर विभागाची अभय योजना :—**

- राज्यकर विभागातर्फे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांकडे असणाऱ्या थकबाकीबाबत अभय योजना जाहीर
- या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांका पासून दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल.

**(ब) व्यक्तिगत मालकीच्या परिवहनेतर चार चाकी सीएनजी व एलपीजी वाहनांवरील मोटार वाहन करामध्ये वाढ :—**

- व्यक्तिगत मालकीच्या परिवहनेतर सीएनजी व एलपीजी वाहनांवरील मोटार वाहन कराच्या दरामध्ये १ टक्क्याने वाढ प्रस्तावित
- सदर दरवाढीमुळे राज्यास अंदाजे वार्षिक रुपये १५० कोटी रुपयाचा अतिरिक्त महसूल सन २०२५-२६ मध्ये मिळणे अपेक्षित

**(क) रुपये ३० लाख्रा पेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवरील मोटार वाहन कर :—**

- रुपये ३० लाख्रा पेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी करण्याचे प्रस्तावित

**(ड) मोटार वाहन कराच्या कमाल मर्यादेत वाढ :—**

- मोटार वाहन कराची कमाल मर्यादा ही रुपये २० लाख्रा वरुन रुपये ३० लाख्र प्रस्तावित
- सदर सुधारणेमुळे राज्यास अंदाजे वार्षिक रुपये १७० कोटी इतका अतिरिक्त महसूल सन २०२५-२६ मध्ये मिळेल

**(इ) बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर एकरकमी कर आकारणी :—**

- बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एस्कॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना मोटार वाहन कराची आकारणी एकरकमी अनिवार्यपणे वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के दराने प्रस्तावित
- सदर दरवाढीमुळे राज्यास अंदाजे वार्षिक रुपये १८० कोटींनी महसूलात वाढ होईल

**(ई) हलक्या मालवाहतुक वाहनांच्या (एलजीव्ही) मोटार वाहन करामध्ये सुसुत्रता :—**

- राज्यात ७५०० किलो वजनापर्यंतच्या मालवाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर ७ टक्के दराने एकरकमी अनिवार्यपणे मोटार वाहन करभरणा करण्याचे प्रस्तावित

- सदर सुधारणेमुळे राज्याच्या महसुलात अंदाजे वार्षिक रुपये ६२५ कोटींनी वाढ होईल

**(उ) पुरक दस्तऐवजासाठीचे मुद्रांक शुल्क :—**

- एकाच व्यवहाराच्या पूर्ततेसाठी एकापेक्षा जास्त दस्तऐवजांचा वापर केल्यास, यापुढे पुरक दस्तऐवजांना रुपये १०० ऐवजी रुपये ५००/- इतके मुद्रांक शुल्क प्रस्तावित

**(ऊ) मुद्रांक अधिनियमातील कलम ३१(१) मधील अभिनिर्णय प्रकरणे :—**

- मुद्रांक शुल्काबाबत अभिनिर्णय प्रक्रियेसाठी सध्या आकारण्यात येणारे शुल्क रुपये १०० ऐवजी रुपये १००० इतके करण्याचे प्रस्तावित

- तसेच निष्पादित दस्त अभिनिर्णयासाठी दाखल करताना प्रथम दर्शनी देय असणाऱ्या मुद्रांक शुल्काची रक्कम जमा करण्याची तरतूद प्रस्तावित

**(ए) ई-मुद्रांक प्रमाणपत्राची तरतूद :—**

- नागरीकांना ऑनलाईन पद्धतीने मुद्रांक शुल्काचा भरणा करणे व प्रमाणपत्र देणे हे सुलभ व्हावे यासाठी कलम १० (३) व (४) मध्ये 'ई-मुद्रांक प्रमाणपत्राची' नवीन तरतूद प्रस्तावित

* * * * *